**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक २१७ वा ● बुधवार २७ डिसेंबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 217 | Date : 27/12/2023 | blow :Wednesday | Page 4 | Price 4


## ‘कोविड’ उपाययोजनांसाठी ‘टास्क फोर्स’ची स्थापना

### आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांची माहिती

मुंबई : कोरोनाबाधितांची वाढती संख्या लक्षात घेता राज्य सरकारने टास्क फोर्सची (Covid Task Force) स्थापना केली आहे. कोविड- १९ च्या (Covid-19) पहिल्या लाटेदरम्यान वाढलेल्या रुग्ण संख्येवर नियंत्रण, त्यावर उपाययोजना करण्यासाठी १३ एप्रिल २०२० रोजीच्या निर्णयान्वये टास्क फोर्स स्थापन करण्यात आला होता. त्यानंतर आता. राज्यात पुन्हा एकदा कोविड-१९ ची रुग्ण संख्या वाढत आहे. तसेच कोरोना विषाणूचा जे.एन १ या प्रकाराचे रुग्ण वाढत आहेत. अशा वाढत्या रुग्णाची संख्या लक्षात घेता या टास्क फोर्सची पुनर्रचना करणे आवश्यक



आहे. त्यानुसार टास्क फोर्सची पुनर्रचना करून नवीन टास्क फोर्सची स्थापना करण्यात आली आहे, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी दिली.

या टास्क फोर्समध्ये अध्यक्षस्थानी आयसीएमआर, दिल्लीचे माजी प्रमुख डॉ. रमण गंगाखेडकर आहेत. तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकच्या कुलगुरू लेफ्ट. जनरल डॉ. माधुरी कानीटकर, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे संचालक आणि बी.जे. मेडिकल कॉलेज, पुणे येथील डॉ. सुरेश कार्यकर्ते, नवले मेडिकल कॉलेज पुणे येथील डॉ. वर्षा पोतदार, नवले मेडिकल कॉलेज, पुणे येथील (फिजिशियन) डॉ. डी. बी. कदम सदस्य आहेत, तर आयुक्त, आरोग्य सेवा सदस्य सचिव असणार आहेत. याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. । पान २ वर

## भारतीय व्यापारी जहाजांवर हल्ला करणाऱ्यांना पाताळातूनही शोधून काढू

### भारताची आक्रमक भूमिका

मुंबई : एमव्ही केम प्लुटो या जहाजावर झालेला ड्रोन हल्ला आणि लाल सागरात एमव्ही साईबाबा या जहाजावर झालेल्या हल्ल्यानंतर भारताने आक्रमक भूमिका घेतली आहे. भारताच्या सागरी हद्दीत नौकांवर हल्ले करणाऱ्यांना पाताळातही जाऊन शोधून काढू आणि त्यांच्याविरोधात कठोर कारवाई करू असा इशारा भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी दिला आहे. भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी सांगितले की, सध्या समुद्रात हालचाली वाढल्या आहेत. भारताची वाढती आर्थिक आणि युद्धशक्ती पाहून काही शक्तींना ईर्ष्या वाटत आहे. काही दिवसांपूर्वी अरबी समुद्रात केम प्लुटो या व्यापारी नौकेवर झालेला ड्रोनहल्ला आणि लाल समुद्रात साईबाबा या व्यापारी नौकेवर झालेल्या हल्ल्याची भारत सरकारने गांभीर्याने दखल घेतली असल्याचे राजनाथ सिंह यांनी म्हटले.

त्यांनी पुढे म्हटले की, भारतीय नौदलाने समुद्रातील देखरेख वाढवली आहे. ज्यांनी कोणीही हे हल्ले घडवले असतील त्यांचा पातळापर्यंत शोध घेतला जाईल आणि त्यांच्याविरोधात कठोर कारवाई केली जाईल, असं आश्र्वासन मी देतो असेही संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटले.

आज मुंबईत भारतीय नौदलाच्या ताफ्यात आयएनएस इंफाळ ही विनाशिका युद्धनौका दाखल झाली. त्यानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात संरक्षण मंत्री राजनाथ सिंह संबोधित करत होते. यावेळी त्यांनी म्हटले की, नौदलाच्या जहाजावर झालेल्या हल्ल्यानंतर भारताने आता समुद्रात गस्त वाढवली आहे. हिंदी महासागर क्षेत्रात समुद्री व्यापारात नवे स्थान गाठेल. तर, नौदल प्रमुख ॲडमिरल आर. हरी कुमार यांनी सांगितले की, व्यापारी जहाजांवर समुद्री चाच्यांचे हल्ले रोखण्यासाठी चार विनाशिका तैनात । पान २ वर

## राज्य मागासवर्गीय आयोगाची पुण्यात महत्त्वाची बैठक, मराठा आरक्षणाच्या कामाचा घेणार आढावा

पुणे: मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी मुंबईत २० जानेवारीपासून उपोषण करण्याचं जाहीर केल्यानंतर आता सरकारी यंत्रणांच्या कामानांही वेग आल्याचं दिसून येतंय. राज्य मागासवर्ग आयोगाची बुधवारी पुण्यात महत्वाची बैठक आयोजित करण्यात येणार आहे. पुण्यातील राणीच्या बागेतील व्हीव्हीआयपी विश्रामगृहात सकाळी ११.३० वाजता ही बैठक होणार असून त्यामध्ये मराठा आरक्षणाच्या विषयावर चर्चा होणार असल्याची माहिती आहे. न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांची आयोगाचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाल्यानंतरची ही दुसरी बैठक असेल.

राज्य मागासवर्गीय आयोगाच्या बैठकीत मराठा समाज आणि खुल्या प्रवर्गाच्या सर्वेक्षणाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कामाचा आढावा घेण्यात येणार आहे. यासोबतच आयोगाच्या कामकाजासाठी कंत्राटी मनुष्यबळ आणि कामासाठी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली जाणार आहे. तसेच ओबीसी संघटनांच्या मागण्याच्या अनुषंगाने शासनाकडून प्राप्त पत्रावर निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती आहे.

राज्य मागासवर्गीय आयोगाच्या या आधीच्या बैठका राजीनामा आणि नाराजीसत्रामुळे गाजल्या होत्या. त्यामुळे मंगळवारी होणाऱ्या या बैठकीकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. या बैठकीला जेष्ठ सदस्य आणि माजी न्यायमूर्ती चंद्रलाल मेश्राम अनुपस्थित राहणार आहेत. न्या. मेश्राम हे आयोगाच्या कार्यपद्धतीवर नाराज असल्याने बैठकीला जाणार नसल्याची माहिती समोर येत आहे

सुनील शुक्रे मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष

गेल्या काही दिवसांपासून राज्य मागासवर्ग आयोगाच्या कामकाजामध्ये। पान २ वर

## ग्राहकांनी आपल्या हक्काबाबत जागरुक राहावे : जिल्हाधिकारी

* जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते राष्ट्रीय ग्राहक दिनाचे फीत कापून उद्घाटन करण्यात आले *जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त बहुउद्देशीय सभागृहाबाहेर लावण्यात आलेल्या विविध शासकीय स्टॉलला भेट देऊन पाहणी केली

सोलापूर/प्रतिनिधीः आजच्या स्पर्धेच्या युगातील ग्राहक हा बाजारपेठेत होणाऱ्या खरेदी विक्री व्यवसायाचा केंद्रबिंदू आहे. परंतु ग्राहकाला आपली फसवणूक होऊ नये यासाठी नेहमी जागरूक राहावे लागेल. २४ डिसेंबर हा राष्ट्रीय ग्राहक दिन म्हणून साजरा करण्यात येतो, या दिवसापुरतीच जागरूकता ग्राहकांनी न ठेवता, वर्षभर ग्राहकांनी जागरूक राहून आपल्या हक्काचे संरक्षण करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त जुने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात आयोजित कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी जिल्हाधिकारी आशीर्वाद बोलत होते. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, जिल्हा अन्नधान्य वितरण अधिकारी सुमित खाडे, सहाय्यक पुरवठा अधिकारी समीर यादव, अखिल भारतीय ग्राहक संघटनेचे अध्यक्ष शशिकांत हरिदास, अखिल भारतीय ग्राहक सभेचे सदस्य दीपक इरकल, ग्राहक पंचायत महाराष्ट्र राज्य सोलापूर जिल्हाप्रमुख शोभा सागर, ग्राहक समिती अध्यक्ष तानाजी गुंड, सदस्य राजेंद्र घाडगे आदि उपस्थित होते. २४ डिसेंबर १९८६ रोजी ग्राहक हक्क कायद्याला



भारताच्या राष्ट्रपती यांनी मंजुरी दिली, तेव्हापासून २४ डिसेंबर हा राष्ट्रीय ग्राहक दिन म्हणून प्रतिवर्षी साजरा केला जात असतो अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी दिली. तसेच भारतीय राज्यघटना व ग्राहक हक्क कायद्याने ग्राहकांना दिलेल्या हक्काची माहिती ही त्यांनी यावेळी सविस्तरपणे दिली.

ग्राहक कायद्याने ज्या पद्धतीने ग्राहक म्हणून जे हक्क व अधिकार दिलेले आहेत त्या पद्धतीने प्रत्येक ग्राहकाचे एक नागरिक म्हणून अनेक कर्तव्यही पार पाडावी लागतात. ग्राहक म्हणून स्वतः सजग राहण्याबरोबरच इतरांनाही त्यांच्या हक्क व कर्तव्य विषयी जागरूक केले पाहिजे. कोणाचीही ग्राहक म्हणून फसवणूक होणार नाही यासाठी ग्राहक हक्क कायद्याविषयी प्रत्येकांना माहिती राहावी यासाठी जनजागृती मोहीम राबवावी, असे आवाहन अखिल भारतीय ग्राहक संघटनेचे अध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी केले.त्याप्रमाणेच ग्राहक तक्रार निवारण चे । पान २ वर

## ओजस क्रियेशन वतीने ट्रुबुट टू मोहम्मद रफी साहब कार्यक्रम

मुंबई : ओजस क्रियेशन, मुंबई आयोजित ट्रुबुट टू मोहम्मद रफी साहब हा कार्यक्रम डजॅन स्टुडियो बोरिवली पश्र्चिम येथे शनिवार २३ डिसेंबर रोजी संपन्न झाला. पद्मश्री प्राप्त रफ़ी साहेबांच्या वाढदिवसाचे ओचित्य साधुन व त्यांच्या सेंटिनल वर्षाचा सोहळा निमित्त हा विशेष कार्यक्रम आयोजित केला होता.आयोजिका ज्योती कुलकर्णी या लेखिका, स्पेशल एजुकेटर व समाजसेविका आहेत. वृत्तपत्रात त्यांचे समाज प्रबोधनाचे व सकारात्मक लेख नियमित येत असतात. गेली ५ वर्ष त्या असे म्यूजिक शो यशस्वीपणे आयोजित करत आहेत. त्यांचे मिस्टर श्रीकांत कुलकर्णी यांची त्यांना मोलाची साथ आहे. ते व्यवसायाने सिवील




इंजिनियर आहेत व त्यांनी शास्त्रीय संगीताचे प्रशिक्षण घेतले आहे आणि ते प्रोफशनल सिंगर आहेत व नवोदित गायकांना ते मार्गदर्शन करतात. आमंत्रित विशेष अतिथी फिल्म टीवी स्टार प्रदीप शर्मा जी, उपेन्द्र पंडित जी, संपादक अमरदीप पेपर, निलम तेली, समाजसेविका, साकेत जी व मातोश्री छाया जैन जी सरगम म्यूजिक व छाया एंटरटेनमेंट, विकास गायकवाड, क्लिक न्यूज मीडिया व इंडिया स्टार न्यूजचे उपसंपादक, संजय कश्यप जी, मिलन सूर

## ७ जानेवारी रोजी तगरभूमी येथे पहिल्या अ.भा.बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन : भंते सुमेध जी नागसेन

सोलापूर/प्रतिनिधी : रविवार दि ७ जानेवारी २०२४ रोजी डॉ.राजरत्न आंबेडकर साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत तगर भूमी धाराशिव (उस्मानाबाद) येथे पहिल्या अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती तगर भूमी बुध्द विहार चे पुज्य भंते सुमेधजी नागसेन यांनी येथे पत्रकारांशी बोलताना दिली.

धाराशिव (उस्मानाबाद ) जिल्ह्यातील सर्व बौद्ध बांधवांना व भिम सैनिकांना कळविण्यात अत्यंत आनंद होत आहे. की उस्मानाबाद शहरापासून दहा किलोमीटर अंतरावर गडदेवदरी या निसर्गरम्य ठिकाणी नव्याने तगर भूमी बुद्ध विहाराची निर्मिती करण्यात येत आहे. अनेक उपासकांनी या विहारासाठी कोणतेना कोणते दान देऊन पुण्य कर्म केले आहे , उस्मानाबाद जिल्ह्यात बौद्ध धम्माचा प्रसार आणि प्रचार वेगाने व्हा म्हनुन बौद्धांचे जागतिक नेते आदरणीय डॉ.राजरत्न आंबेडकर साहेब यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये रविवार दि .७ जानेवारी २०२४ रोजी सकाळी १० :०० पासून तगर भूमी येथे पहिल्या अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. आपण या ऐतिहासिक बौद्ध धम्म परिषदेस सहकुटुंब उपस्थित राहुण धम्म देसणेचा लाभ घ्यावा परम पूज्य बोधीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या धम्म चळवळीचा रथ पुढे घेऊन जाण्यास तन ,मन ,धनाने सहकार्य करावे असे आवाहन भंते सुमेधजी नागसेन ( तगर भूमी ) यांनी केले असून पुढील मोबाईल नंबर ९९६०४९८३५८ अधिक माहितीसाठी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.




## पत्रकारांना विविध सोई-सुविधा देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध : उपमुख्यमंत्री अजित पवार

पुणे : राज्य शासनाच्यावतीने पत्रकारांना आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना, शंकरराव चव्हाण सुवर्णमहोत्सवी पत्रकार कल्याण निधीच्या माध्यमातून सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात; आगामी काळातही पत्रकारांना विविध सोई-सुविधा देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध राहील, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिली.

पिंपरी-चिंचवड शहरातील हॉटेल इलेव्हन २३ येथे आयोजित 'पुणे अचिव्हर्स २०२३' या कॉफीटेबल पुस्तकाचे प्रकाशन आणि पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह, माजी आमदार विलास लांडे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, सरचिटणीस विश्र्वास आरोटे, संघटक संजय भोकरे, पश्र्चिम महाराष्ट्र पत्रकार संघाचे अध्यक्ष नितीन शिंदे, पिंपरी-चिंचवड शहर कार्यकारिणीचे सदस्य बबन पवार आदी उपस्थित होते.श्री. पवार म्हणाले, आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजनेच्या माध्यमातून राज्यातील ज्येष्ठ पत्रकारांचा आदरपूर्वक सन्मान करण्यासाठी, त्याच्या कार्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांना सन्मानपूर्वक मानधन देण्यात येत आहे. पत्रकारांना दुर्धर आजार, अपघात झाल्यास किंवा आकस्मिक मृत्यू झाल्यास



त्यांना किंवा त्यांच्या कुटुंबियांस शंकरराव चव्हाण सुवर्णमहोत्सवी पत्रकार कल्याण निधीतून मदत करण्यात येते. या निधीसाठी अर्थसंकल्पीय अधिवेशनात ५० कोटी रुपये देण्याची घोषणा करण्यात आली आहे. आता आधीचे ५० कोटी आणि अर्थसंकल्पीय अधिवेशनातील ५० कोटी असे १०० कोटी रुपये झाले आहेत. पत्रकारांच्या मागण्यांबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करुन योग्य तो मार्ग काढण्यात येईल, असेही ते म्हणाले.

आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण'च्या माध्यमातून मराठी पत्रकारितेचा पाया रचला आहे. मराठी पत्रकारितेला निर्भीडता, नि:पक्षपातीपणा आणि लोकाभिमुखतेचा वारसा मिळालेला आहे. राज्य शासनाच्यावतीने घेण्यात आलेले निर्णय, ध्येयधोरणे, उपक्रम नागरिकापर्यंत पोहचविण्याचे काम अतिशय चांगल्याप्रकारे माध्यमांनी केले आहे. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाअंतर्गत करण्यात आलेली कामे तळागळापर्यंत पोहचविण्याचे माध्यमांनी अतिशय चांगले काम केले. त्यांच्या कार्याची दखल घेऊन शासनाच्यावतीने त्यांचा पुरस्कार देऊन सन्मानही करण्यात आला.

सुरुवातीला लोकशिक्षण, ज्ञानप्रसार आणि देशाला स्वातंत्र्य मिळण्याकरीता पत्रकारिता करण्यात येत होती. स्वातंत्र्यपूर्वकाळात ब्रिटीशकालीन चुकीच्या धोरणाविरुद्ध विरोध करण्याचे काम मराठी माध्यमांनी नेटाने केले. मराठी वृत्तपत्रातून समाज घडविण्याचे काम करण्यात आले. त्या काळातील ध्येयनिष्ठ पत्रकारांनी वृत्तपत्र समाज प्रबोधनासाठी, स्वातंत्र्यप्राप्तीसाठी, जनजागृतीसाठी प्रभावी माध्यम असल्याचे दाखवून दिले. आज काळात या गोष्टीचा आदर्श घेऊन काम करण्याची गरज आहे.समाज माध्यमाच्या युगात नागरिकांना जलद बातम्या मिळण्याकरीता पत्रकार काम करीत असतात. चुकीच्या गोष्टीवर टिकाटिप्पणी करणे माध्यमांचा हक्क आहे.पत्रकारांनी चांगल्या गोष्टी समाजापुढे आणण्यासाठी आणि वाईट गोष्टीला रोखण्यासाठी काम करावे. घडलेल्या घटनेचे वार्तांकन करण्यासोबत सामाजिक स्वास्थ जपण्यासाठी वस्तुस्थितीदर्शक बातमी दाखविण्याचे काम माध्यमांनी करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी केले.

पुणे अचिव्हर्स २०२३' या कॉफीटेबल पुस्तकाच्या माध्यमातून समाजातील विविध क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्तीना समाजापुढे आणण्याचे काम केले आहे. देशाच्या, समाजाच्या प्रगतीत आणि उन्नतीत त्यांचे योगदान आहे. यातून इतरांनीही प्रेरणा घेऊन आपापल्या क्षेत्रात काम करत अपेक्षित उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रयत्न करावे, असे उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले.

श्रीमती चाकणकर म्हणाल्या, बदलत्या युगात प्रवाहाच्याविरुद्ध निर्भीडपणे । पान २ वर

# संपादकीय

## घटक पक्षास...

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा विजय निश्चित आहे आणि विरोधी पक्ष विरोधी बाकांवरच बसणार आहे, असे आत्मविश्वासपूर्वक उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले आहेत. वास्तविक रालोआ आघाडीत ताकदीचे घटक पक्ष नाहीत. छोटे छोटे पक्ष आहेत. अर्थात महाराष्ट्रातील एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजितदादा पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस गट रालोआमध्ये असून, या पक्षांकडे बऱ्यापैकी शक्ती आहे. परंतु एकुणात भाजपची ताकद यावेळी वाढेल व त्याचा काहीसा फायदा घटक पक्षांनाही होईल आणि पूर्वीपेक्षा अधिक जागा रालोआ आघाडीला मिळतील, असा भाजपचा आडाखा आहे. तीन राज्यांतील विधानसभा निवडणुकांत भाजपला दणदणीत यश मिळाल्यामुळे त्या पक्षात उत्साह संचारला आहे. याउलट इंडिया आघाडीच्या आरंभीच्या उत्साहावर पाणी पडले आहे. परंतु, असे असूनही या आघाडीतील महत्त्वाचा हिस्सा असलेल्या काँग्रेस पक्षाने लोकसभा निवडणुकांची तयारी सुरू केली असून जाहीरनामा समिती स्थापन करणे, जागावाटपाच्या वाटाघाटींना गती देऊन उमेदवार निश्चिती करणे या दिशेने काम सुरू केले आहे. वयाची ऐंशी पार केलेले काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे तसेच राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार हे दोघेही नेते जोरात कामाला लागले आहेत. इंडिया आघाडीचे काम फार संथ गतीने सुरू मन लवचिक करा आ आहे, अशी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांची तक्रार आहे. पश्चिम बंगालमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि काँग्रेसशी आघाडी करण्यास त्यांनी तयारी दर्शवली आहे. तृणमूल, काँग्रेस आणि माकप हे इंडिया आघाडीचे घटक पक्ष आहेत. परंतु, पश्चिम बंगालमध्ये माकप आणि तृणमूलचे संबंध बरे नाहीत. त्याचप्रमाणे काँग्रेसचे लोकसभेतील विरोधी पक्षनेते अधीररंजन चौधरी हे दीदींवर सातत्याने टीका करत असतात. ममतादीदी या माकप व काँग्रेसबरोबर जागावाटपाचा समझोता करण्यास तयार असल्या तरी एकत्रितपणे राजकीय प्रचार करण्यास त्या तयार नसतील आणि आम्हाला सामूहिक राजकीय प्रचारात रस आहे, असे मत माकपचे बंगालचे सचिव मोहम्मद सलीम यांनी व्यक्त केले आहे. इंडिया आघाडीत बसपा नसला तरी सपा आणि आरएलडी हे पक्ष काँग्रेसला फार जागा सोडतील, असे वाटत नाही. अशावेळी जागांवरून पेच निर्माण होण्याची शक्यता आहे. उत्तर प्रदेशात समझोता होऊ न शकल्यास, इंडिया आघाडीच्या दृष्टीने प्रतिकूल परिस्थिती निर्माण होईल. म्हणूनच आघाडीतील प्रत्येक घटक पक्षास मन मोठे करून लवचिकता दाखवावी लागेल.

# रामदास आठवले : प्रबुध्द नेतृत्व



बोधीसत्व महामानव डॉं. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा पुढे घेवुन जाणारे लोकनेते संघर्षनायक रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांचा उद्या सोमवार दिनांक २५ डिसेंबर २०२३ रोजी वाढदिवस साजरा होत आहे. संघर्षनायक ना.रामदास आठवले यांचा वाढदिवस रिपब्लिकन पक्षाच्या वतीने देशभर संघर्ष दिन म्हणून साजरा होतो. ना.रामदास आठवले यांच्या वाढदिवसानिमीत्त रिपब्लिकन पक्षाचे प्रसिध्दी प्रमुख पत्रकार हेमंत रणपिसे यांनी ना. रामदास आठवले यांच्या वाढदिवसानिमीत्त लिहलेला हा अभिष्टचिंतनपर लेख.

दलित पँथरच्या चळवळीत तावूनसुलाखुन निघालेले रामदास आठवले यांचे तेजस्वी व्यक्तिमत्व आहे. त्यांचे वक्तृत्व आणि नेतृत्व राष्ट्रीय स्तरावर लोकप्रिय आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मंत्रीमंडळातील केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री आणि रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून आज ना.रामदास आठवले ख-या अर्थाने राष्ट्रीय नेते आहेत. ईशान्य भारतातील आसाम, मेघालय, मिझोरम, मणिपुर, अरुणाचल प्रदेश, सिक्कीम, नागालँड या राज्यांमध्ये यापूर्वी कधीही कोणताही रिपब्लिकन गट पोहचला नाही. रामदास आठवले यांनी मात्र ईशान्य भारताच्या सातही राज्यात महामानव डॉं.बाबासाहेब आंबेडकरांच्या रिपब्लिकन पक्षाचा निळा झेंडा पोहचविला आहे. वर्षभरापूर्वीच नागालँड राज्याच्या विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचे दोन उमेदवार स्वबळावर निवडुन आले. ही मोठी अभिमानाची बाब आहे. नागालँड सारख्या दुर्गम भागात महामानव डॉं. बाबासाहेब आंबेडकरांचा रिपब्लिकन पक्ष पोहोचवून तेथे २ आमदार स्वबळावर निवडुन आणण्याची किमया रामदास आठवले यांनी केली आहे. काही नेते रिपब्लिकन संकल्पनेपासुन दुर पळत असताना रामदास आठवले मात्र रिपब्लिकन पक्ष जिवंत ठेवण्यासाठी लढत आहेत. माझ्या शरिरात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत मी महामानव डॉं.बाबासाहेब आंबेडकरांच्या रिपब्लिकन पक्षाला जिवंत ठेवणार ही त्यांची भिमप्रतिज्ञा आहे. संसदेत जेव्हा रामदास आठवले भाषणासाठी उभे राहतात. तेव्हा ते आपली ओळख डॉं.बाबासाहेब आंबेडकरांच्या रिपब्लिकन पक्षाचा खासदार म्हणून करुन देतात. जयभीमच्या घोषणेने आणि त्यांच्या अफलातुन काव्यमय शैलीने संसदेतील त्यांचे भाषण नेहमी संस्मरणीय ठरत असते. देशभरातील दलित, बहुजनांचा, आंबेडकरी चळवळीचा राष्ट्रीय चेहरा म्हणून ना. रामदास आठवले यांचे नेतृत्व राष्ट्रव्यापी लोकप्रिय ठरले आहे.

दिल्लीत त्यांचे सफदरजंग रोडवर शासकीय निवासस्थान आहे. त्या निवासस्थानाच्या प्रांगणात प्रचंड मोठया वटवृक्षाखाली महाकारुणी तथागत भगवान गौतम बुध्दांच्या मुर्तीची स्थापना

ना.रामदास आठवले यांनी केली आहे. तसेच हिरवळीवर बोधीसत्व महामानव डॉं. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा ना.रामदास आठवले यांनी उभारलेला आहे. कोणत्याही केंद्रीय मंत्र्याच्या बंगल्यात असे भव्य पुतळे पाहणे अशक्य असतांना ना.रामदास आठवले यांच्या शासकीय निवासस्थानी बुध्द –भिमाची मुर्ती पाहुन आंबेडकरी अनुयायांचा अभिमानाने ऊर भरुन येतो. दिल्लीत आपला हक्काचा माणूस रामदास आठवले आहेत अशी भावना त्यांच्या मनात निर्माण होते. देशभरातुन आंबेडकरी चळवळीचे, रिपब्लिकन पक्षाचे कार्यकर्ते, विविध जातीधर्माचे लोक ना.रामदास आठवले यांना भेटण्यासाठी त्यांच्या सशास्त्रीभवन येथील मंत्रालयाच्या दालनात आणि त्यांच्या सफदरजंग शासकीय निवासस्थानी मोठी गर्दी करीत असतात. या गर्दीत ग्रामीण भागातुन आलेले गोरगरीब कार्यकर्ते मोठया प्रमाणात असतात. दुर्गम भागातुन आलेले हालअपेष्टीतील, दीनदुबळे, फाटक्या कपडयातील कष्टकरी लोकही असतात. आपल्याकडे भेटायला आलेल्या प्रत्येकाला ना. रामदास आठवले भेटतात. त्यांची विचारपूस करतात. त्यांचे काय काम आहे त्याबाबत संबंधीतांना फोन करतात. पत्र देतात. आलात कसे, जाणार कसे, राहणार कुठे याची चौकशी करतात. देशभरातुन आलेल्या गरिबांना त्यांच्या दिल्लीतील निवासस्थानी प्रत्येकाला ते दोन्ही वेळेस जेवण देतात. शंभरपेक्षा जास्त लोक त्यांच्या शासकिय निवासस्थानातील गेस्ट हाऊस आणि हॉलमध्ये वास्तव्य करतात. त्यांच्या निवासस्थानी दररोज शंभर पेक्षा जास्त लोकांना जेवण दिले जाते. अलिकडच्या काळात फाटक्या तुटक्यात आलेल्या माणसांना बघुन लोक दुर पळतात. मात्र रामदास आठवले हे अशा गरीब लोकांना आपल्या अधिक जवळ करुन मदत करतात. त्यांचे प्रश्र्न सोडवतात, कधी कधी आपल्या खिशात हात घालून त्यांना मदत करतात. रंजल्यागांजल्यावर प्रेम करणारा हा नेता खरा लोकनेता आहे. त्यांच्या मनात ही अपार करुणा कुठुन आली याचा विचार केला तर रामदास आठवले हे बुध्द तत्वज्ञान जगणारे खरे प्रबुध्द नेते आहेत असे मला वाटते. पुजनीय भिख्खु संघाचा नेहमी आदर करणारे ; धम्मदानात पुढे असणारे धम्मप्रिय नेते रामदास आठवले हे आहेत.

सब्ब पप्पास अकरणम् कुसलस्स उपसंपदा
सचित्त परियोदपनंग एतंग बुद्धानू सासनम्

हा भगवान बुद्धांचा संदेश आपल्या जीवनात अनुसरून चांगले वाईट यात राजहंसा सारखा फरक ओळखून ना.रामदास आठवले हे मन निर्मळ ठेऊन चांगले कुशल कर्म करीत आहेत. त्यामुळे धम्म जगणारे ते धम्मधर नेते आहेत याची त्यांना भेटल्यावर खात्री पटते. अनेक कवि, कलावंत, लोकशाहीर, साहित्यीक, पत्रकार, यांच्याशी जीवाभावाचे संबंध ठेवून त्यांच्याशी मैत्रीभाव जपणारे रामदास आठवले हे प्रत्येकाबद्दल आपल्या मनात मंगलमैत्री बाळगतात. भगवान बुध्दांनी सांगितेलेले प्रज्ञा, शिल, करुणा या तत्वांचा आपल्या जीवनात आंतरभाव करुन धम्म आचरण करणारा नेता म्हणजे रामदास आठवले आहे.

बौध्द धम्म हा आदर्श जीवन मार्ग आहे. तो आदर्श जीवन मार्ग त्यांनी आपल्या राजकीय जीवनातही आणलेला आहे. त्यांच्याकडे कामासाठी येणारे अनेक लोक वेगवेगळया जातीधर्माचे गटातटाचे असतात. त्यांचे काम झाल्यानंतर ते पुन्हा आपआपल्या गटात तटात पक्षात परतल्यावर त्यातील काही लोक रामदास आठवलेंवर त्यांच्या राजकीय घडामोंडीबाबत टीका करीत असतात. पुन्हा अशा लोकांना काही अडचणी आल्यास त्या सोडविण्यासाठी ते पुन्हा रामदास आठवले यांना भेटतात आणि आपले काम करुन घेतात. अशा लोकांना रामदास आठवलेंचे कार्यकर्ते त्यांच्या त्यांच्या भागात ओळखतात आणि पुन्हा असा टीका करणारा माणूस फक्त कामासाठी रामदास आठवले यांच्याकडे आल्यानंतर अशा टीकाकाराला थांबविण्याचा प्रयत्न रामदास आठवले यांचे कार्यकर्ते करतात. त्यावेळी आपल्या कार्यकर्त्यांना रोखण्याचे काम रामदास आठवले करतात. त्यांच्याकडे रिपब्लिकन पक्षाच्या विविध गटाचे लोक बसपा, बामसेफचे लोक सर्व प्रस्थापित पक्षांचे लोक रामदास आठवलेंकडे येत असतात. तेव्हा ते या सर्वांना समतेच्या आणि ममतेच्याच भावनेने बघतात. आपल्याकडे आलेल्या कोणत्याही व्यक्तीबाबत तो माझा विरोधक आहे, तो विरोधी गटाचा आहे. असा कोणताही दुर्विचार ते करीत नाही. पक्षभेद, जातीभेद, धर्मभेद, असा ते कोणताही भेदभाव करीत नाहीत. सर्व जातीधर्मीयाना आपले माणून काम करतात. आंबेडकरी समाजातील सर्वच गटाचे लोक हे माझेच आहेत या भावनेने ते प्रत्येकाला मदत करीत असतात. प्रत्येकाकडे बघण्याचा हा सम्यक दृष्टीकोन ही समतेची भावना त्यांच्या मनात आलेली आहे ती बुध्द विचारांच्या खोल संस्कारातुन त्यांच्या मनावर बिंबलेली आहे. टीका, टीका, टीका पचवायची कशी ती माझ्याकडुन शिका असे नेहमीच रामदास आठवले सांगतात. अनेक लोक त्यांच्यावर नेहमी कारण नसतांनाही टीका करीत असतात. अनेक नवयुवकांना रामदास आठवले यांचे समाज आणि राष्ट्र उभारणीतील योगदान माहिती नसताना नाहक टीका करीत असतात. कोणी आपल्यावर टीका केली म्हणून ना. रामदास आठवले व्यथीत होत नाहीत. उलट टीकाकारांना हसून उत्तरे देतात. तसेच कोणी तारीफ केली म्हणूनही ते हुरळुन जात नाहीत. टीका आणि तारिफ या दोन्हीमुळे ते आपल्या मनाचा तोल ढळु देत नाहीत. ते स्थीतप्रज्ञ राहतात. दुस–यांवर ते कधीही वाईट टीका करीत नाहीत. व्यक्तिगत कुणावरही टीका करीत नाहीत. महाराष्ट्रात आंबेडकरी चळवळीमध्ये प्रकाश आंबेडकर आणि रामदास आठवले या दोन नेत्यांची नेहमीच चर्चा असते. मागे एकदा पत्रकारांनी प्रकाश आंबेडकरांना रामदास आठवले यांच्याबाबत काही प्रश्र्न विचारले तेव्हा प्रकाश आंबेडकर यांनी कोण रामदास आठवले असा खोचक प्रश्र्न विचारुन रामदास आठवलेंना आपण ओळखत नसल्याची टीका केली होती. तो संदर्भ घेवून पत्रकारांनी रामदास आठवले यांना प्रकाश आंबेडकरांबाबत प्रश्र्न विचारले तेव्हा रामदास आठवले यांनी प्रकाश आंबेडकर हे आमचे नेते आहेत. डॉं. बाबासाहेब आंबेडकराचे नातु आहेत असा आदराने उल्लेख केला होता. त्यांनी टीका केली म्हणून मी पण टीका करेल अशी भावना ना.रामदास आठवले यांची नाही. आपल्यावर टीका करणा–यांवर ते प्रेम करतात. टीकाकारांचा, विरोधकांचाही ते आदर करतात. प्रत्येकाबद्दल मनामध्ये चांगले विचार ठेवतात. टीका ते पचवितात पण उलट ते कोणावरही टीका करत नाहीत. मनामध्ये कुणाबद्दल द्वेष, वैरभाव, स्पर्धा, इर्षा ते बाळगत नाहीत. प्रत्येक माणसाबद्दल ते सकारात्मक विचार करतात. मन निर्मळ ठेवून राजकारणामध्ये पाय घट्ट रोवून उभा असणारा राजकीय नेता रामदास आठवले आहेत. राजकारणासारख्या दलदलीत असतांनाही रामदास आठवले यांचे मन निर्मळ, कोमल कमळासारखे कसे असा प्रश्र्न पडतो. त्याचे उत्तर हे बुध्दतत्वज्ञानामध्येच सापडते. रामदास आठवले यांच्या मनावर बुध्द विचारांचे संस्कार आहेत. त्यांच्या मनात करुणा, दयाबुध्दी, मंगल मैत्रीभाव आहे.

तोडणे सोपे जोडणे अवघड या विचाराने ते दोन समाजाला जोडण्याचे काम करतात. त्यासाठी त्यांनी मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी असो की, शिवशक्ती भीमशक्ती भाजप युतीचा प्रयोग असो. त्यांनी अनेक प्रयोग केले. त्यांनी रिपब्लिकन डावी लोकशाही समिती (रीडालोस) चा प्रयोग केला. दलित मराठा ऐक्य परिषदा घेतल्या. मराठा आरक्षण हक्क परिषद घेतली. मुस्लिम समाजाच्या मागणीसाठी गोवंश हत्याबंदी विधेयका विरुध्द त्यांनी मोर्चाही काढला. सर्व समाजाला जोडण्यासाठी त्यांनी संविधान शक्तीमार्च महाराष्ट्रात काढला. त्यानंतर संपूर्ण देशात जाती तोडो, समाज जोडोचा नारा देत कन्याकुमारी ते काश्मिर मार्गे भिमजन्मभूमी महु येथपर्यंत भारत भीम यात्रा काढली.

मनात बुध्द आणि भीम विचार घेवून काम करणारे लोकनेते रामदास आठवले आज लोकप्रिय राष्ट्रीय नेते ठरले आहेत. देशभरातील २८ राज्य आणि ८ केंद्रशासीत प्रदेशात त्यांनी रिपब्लिकन पक्षाचा निळा झेंडा फडकवला आहे. महामानव डॉं. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला बौध्द धम्म; त्यांनी पाहिलेले भारत बौध्दमय करण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी काम करणारा प्रबुध्द नेता म्हणजे रामदास आठवले आहेत. १४ ऑक्टोंबर १९५६ रोजी महामानव

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लाखो अनुयांयासह बौध्द धम्माची दीक्षा घेवुन ऐतिहासिक धम्मचक्रप्रवर्तन केले. तेव्हा त्यांनी १६ डिसेंबर १९५६ रोजी मुंबईत महालक्ष्मी रेसकोर्सच्या मैदानात धम्मदीक्षा सोहळा आयोजित करण्याचा संकल्प जाहीर केला होता. तो संकल्प पूर्ण करण्यासाठी धम्मदीक्षा सुवर्ण महोत्सवी वर्षात २००६ साली ना. रामदास आठवले यांनी प्रयत्न केला. मात्र मे २००७ मध्ये महालक्ष्मी रेसकोर्सच्या मैदानात ना. रामदास आठवले यांच्या नेतृत्वात भव्य धम्मदीक्षा सूवर्ण महोत्सव सोहळा साजरा करण्यात आला. त्यावर्षी १६ डिसेंबर या तारखेला धम्मदीक्षा सुवर्ण महोत्सव सोहळा साजरा करता आला नाही. डॉं.बाबासाहेब आंबेडकरांचा संकल्प होता की, १६ डिसेंबर १९५६ ला महालक्ष्मी रेसकोर्स मैदानात धम्मदीक्षेचा सोहळा आयोजित करणार मात्र त्यापूर्वीच महामानव डॉं. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण झाले. त्यामुळे त्यांचा तो संकल्प अधुरा राहिला. बोधिसत्व डॉं.बाबासाहेब आंबेडकरांचा तो संकल्प पूर्ण करण्यासाठी रामदास आठवले या नेत्याने कंबर कसुन १६ डिसेंबर २०२३ रोजी महालक्ष्मी रेसकोर्स मैदानात जागतिक बौध्द धम्म परिषद आयोजित करुन डॉं.बाबासाहेब आंबेडकरांचा तो संकल्प पूर्ण केला. स्वतःला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे वारसदार म्हणणा–या कोणत्याही नेत्याने किंवा कोणत्याही मातृपितृ संस्थेने डॉं.बाबासाहेब आंबेडकरांचा महालक्ष्मी रेसकोर्स मैदानात १६ डिसेंबरला धम्मदीक्षा कार्यक्रम घेण्याचा संकल्प पूर्ण करण्याचा मागील ६७ वर्षात विचारही केला नाही. डॉं.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय जनतेला खुले पत्र लिहून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची संकल्पना मांडली. ही संकल्पना पूर्ण करण्यासाठी ती जिवंत ठेवण्यासाठी आणि तिला वाढविण्यासाठी ना.रामदास आठवले दिवस रात्र एक करुन पायाला भिंगरी बांधून देशभर काम करीत आहेत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा रिपब्लिकन पक्ष आणि त्यांचा निळा झेंडा काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत पोहचविण्याचे काम हे रामदास आठवले यांनी केले आहे. हे काम करीत असतांना ते इतर कोणावरही टीका न करता केवळ डॉं.बाबासाहेब आंबेडकरांचा विचार सांगत ते देशभर फिरत आहेत. भगवान बुध्दांच्या धम्माच्या संस्काराने घडलेला रामदास आठवले हा प्रबुध्द नेता. डॉं. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रत्येक संकल्प पूर्ण करण्यासाठी झटत आहे. त्यामुळेच त्यांच्या कामाची दखल वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुध्दिस्ट या बँकॉक मधील जागतिक बौध्द संघटनेने घेतली आहे. वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुध्दीस्टच्या आंतरराष्ट्रीय उपाध्यक्षपदी कायमस्वरुपी नियुक्तीचा बहुमान रामदास आठवले यांना लाभला आहे. वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुध्दीस्ट ही जगातील प्रमुख बौध्द संघटना आहे. महामानव डॉं.बाबासाहेब आंबेडकरांच्या उपस्थितीत श्रीलंकेत कोलंबो येथे या बौध्द संघटनेची स्थापना झाली आहे. वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुध्दीस्टच्या रंगुन आणि काठमांडु येथे झालेल्या जागतिक धम्मपरिषदेला बोधीसत्व महामानव डॉं. बाबासाहेब आंबेडकर हे उपस्थित राहिलेले होते. त्यामुळे वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुध्दीस्ट या जागतिक संघटनेला महत्व आहे. अशा महत्वपूर्ण आंतरराष्ट्रीय बौध्द संघटनेने रामदास आठवले यांना आंतरराष्ट्रीय उपाध्यक्ष पदाचा बहुमान देवून प्रबुध्द नेता म्हणून शिक्कामोर्तब केले आहे. तन मन धनाने समाज आणि देशासाठी समर्पित असणारे लोकनेते; राष्ट्रीय नेते रामदास आठवले यांच्या हातून देशसेवा, धम्मसेवा अधिकाधिक होत राहो त्यासाठी त्यांचे हात यांना दिर्घआयुष्य आणि चांगले आरोग्य लाभो.

**हेमंत रणपिसे,**
**प्रसिद्धिप्रमुख – ९००४४८८४६५**

पान १ वरुन

## पत्रकारांना विविध सोई–सुविधा ..

आणि विवेकबुद्धीला जागृत ठेवून सामाजिक वास्तव्य समाजासमोर आणणे हे खऱ्या पत्रकारितेचे काम आहे. वंचित, दुर्बल अशा घटकांचा आवाज होण्याचे कामही पत्रकारितेने केले आहे. समाजात महिलांवर होणाऱ्या घटना आणि अत्याचार माध्यमांनी समोर आणावे, घडलेल्या घटनेबाबत सतत पाठपुरावा करुन संबंधित पीडिताला न्याय देण्याची भूमिका ठेवावी, असेही श्रीमती चाकणकर म्हणाल्या.श्री. मुंडे म्हणाले पिंपरी–चिंचवड या औद्योगिक, ऐतिहासिक, अध्यात्मिक नगरीमध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करुन त्यांची यशोगाथा कॉफ़ीटेबल पुस्तकाच्या माध्यमातून समाजासमोर आणण्यात आली आहे.

प्रास्ताविकात श्री. भोकरे म्हणाले, पत्रकारिता क्षेत्रात सामाजिक जाणिव ठेवून पत्रकाराने नेहमी प्रयत्नवादी राहून काम करावे. या माध्यमातून आदर्श पत्रकारितेच्या व्रताचे पालन करावे. यावेळी श्री. पवार यांच्या हस्ते साहित्य, कला, क्रीडा, राजकारण, शिक्षण, उद्योग आदी क्षेत्रातील विविध मान्यवरांना 'पुणे अचिव्हर्स २०२३' पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

## 'कोविड' उपाययोजनांसाठी 'टास्क..

गंभीर आणि अतिगंभीर आजारी कोविड–१९ रुग्णांसाठी रुग्ण व्यवस्थापन प्रोटोकॉल स्थापन करणे, कोविड–१९ क्रिटीकल केअर हॉस्पिटलमध्ये तज्ञ डॉक्टर आणि आरोग्य सेवा सहायक कर्मचाऱ्यांच्या आवश्यकतेची शिफारस करणे, गंभीरपणे आजारी कोविड–१९ रुग्णांवर उपचार करताना एकसमानता राखण्यासाठी योग्य औषध प्रोटोकॉलची शिफारस करणे आदी कार्यवाही हा टास्क फोर्स करणार आहे. **राज्यात मंगळवारी ३७ नव्या कोरोना रुग्णांची भर, मुंबईत सर्वाधिक रुग्ण** राज्यात कोरोना रुग्णांच्या संख्येत दररोज वाढ होतेय. मंगळवारी (२६ डिसेंबर) राज्यात ३७ नव्या कोरोना रुग्णांची भर पडली. सर्वाधिक रुग्ण मुंबईत आढळले आहेत. त्यानंतर ठाणे आणि पुण्यातही दररोज रुग्ण वाढत आहेत. नाताळ आणि नववर्षामुळे मोठ्या प्रमाणात गर्दी वाढली. त्यामुळे पुढील काही दिवस राज्यातील कोरोना रुग्णांचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. राज्यात २६ डिसेंबरपर्यंत जेएन १ व्हेरियंटचे १० रुग्ण आहेत.

## भारतीय व्यापारी जहाजांवर..

करण्यात आल्या आहेत. यामध्ये पी–८आय विमान, डोर्नियर्स, सी गार्डियन, हेलिकॉप्टर आणि तटरक्षक जहाजे यांचा समावेश आहे.

## ग्राहकांनी आपल्या हक्काबाबत

अध्यक्ष अशोक भैसारे यांनीही ग्राहकाची फसवणूक होऊ नये यासाठी घ्यावयाची दक्षता तसेच फसवणूक झाल्यानंतर तक्रार कशा पद्धतीने करून चांगली वस्तू अथवा पैसे परत कसे मिळवायचे या विषयी माहिती दिली. ग्राहक हा बाजारपेठेचा राजा असून कोणत्याही प्रकारे ग्राहकाची फसवणूक होणार नाही याची काळजी प्रत्येक सजग नागरिकांनी स्वतःहून घ्यावी असे आवाहन यावेळी त्यांनी केले.

ग्राहक म्हणून बाजारपेठेत वस्तू खरेदी करत असताना प्रत्येकाला त्या वस्तूची संपूर्ण माहिती असणे आवश्यक आहे. नसेल तर संबंधित व्यापाऱ्यांकडून त्या गोष्टीविषयी संपूर्ण ज्ञान घ्यावे. तसेच खरेदी केलेल्या वस्तूची जीएसटी नंबर सह पक्की पावती प्रत्येकाने घेणे अनिवार्य असल्याचे मत अखिल भारतीय ग्राहक सभेचे अध्यक्ष दीपक इरकल यांनी व्यक्त केले. सध्याचे डिजिटल युगात ऑनलाईन खरेदी ही ग्राहकाकडून मोठ्या प्रमाणावर केली जात आहे तसेच या ठिकाणीही ग्राहकांची फसवणूक होऊ शकते तरी ऑनलाईन खरेदी विषयी ग्राहकांनी जागरूक राहिले पाहिजे. डिजिटल इंडिया क्ट, ग्राहक सुरक्षा कायदा या विषयी त्यांनी सविस्तरपणे माहिती देऊन ग्राहक जर जागरूक असेल तर त्याची फसवणूक कोणीही करणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

प्रभात फेरीः राष्ट्रीय ग्राहक दिनाचे औचित्य साधून जिल्हा पुरवठा विभागाच्या वतीने ग्राहक जनजागृतीसाठी सिद्धेश्र्वर प्रशाला सोलापूर तसेच एनसीसीचे विद्यार्थी यांच्या वतीने चार हुतात्मा पुतळा ते जुने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरापर्यंत ग्राहक प्रबोधन रॅली सकाळी नऊ पंचेचाळीस वाजता काढण्यात आली. रॅलीचा समारोप जुने जिल्हाधिकारी कार्यालय येथे झाला.

जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते उद्घाटनः जुने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या अनुषंगाने विविध शासकीय विभागांचे माहितीपर स्टॉल लावण्यात आले होते. या स्टॉलचे तसेच राष्ट्रीय ग्राहक दिनाच्या कार्यक्रमाचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी फीत कापून उद्घाटन केले. येथील प्रत्येक स्टॉलला जिल्हाधिकारी यांनी भेट देऊन माहिती घेतली.तसेच येथे येणाऱ्या नागरिकांना विविध शासकीय योजनेची सविस्तर माहिती द्यावी तसेच पात्र लाभार्थ्यांना तात्काळ लाभ द्यावा, असेही त्यांनी निर्देशित केले.स्टॉलः राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त जुने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर, वैद्यमापनशास्त्र यंत्रणा, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी सोलापूर, सहाय्यक आयुक्त अन्न व औषध प्रशासन, समाज कल्याण विभाग, विक्रीकर विभाग आदी विभागांचे माहितीपर स्टॉल लावण्यात आलेले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्राहक समिती सदस्य राजेंद्र घाडगे तर आभार सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी श्रीमती शिल्पा ओसवाल यांनी मानले.

## राज्य मागासवर्गीय आयोगाची..

सरकारचा हस्तक्षेप वाढल्याची तक्रार करत काही सदस्यांनी राजीनाम्याचं शस्त्र उगारलं. आयोगाच्या तीन सदस्यांनी राजीनामा दिल्यानंतर शेवटी आयोगाचे अध्यक्ष आनद निरगुडे यांनीही राजीनामा दिला होता. त्यानंतर मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष म्हणून निवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांची नियुक्ती करण्यात आली. निवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांनी गेली दहा वर्षे मुंबई उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून काम केले असून या वर्षी २४ ऑक्टोबरला ते सेवानिवृत्त झालेत.

तीन नवीन सदस्यांची नियुक्ती संजीव सानावणे यांच्या जागी मच्छिंद्रनाथ मल्हारी तांबे, लक्ष्मण हाके यांच्या राजीनाम्यानंतर त्यांच्या जागी सरकारने मारुती शिकारे आणि बालाजी किल्लारीकर यांनी आरोप करत सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांच्या जागी ओमप्रकाश शिवाजीराव जाधव यांची नियुक्ती केली आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# संघर्षनायक डॉ. रामदास आठवले यांचा वाढदिवस रिपाइं सोलापूर शहराच्या वतीने प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या प्रमुख उपस्थितीत जल्लोषात साजरा

सोलापूर/प्रतिनिधीः हर जोर जुल्म की टक्कर मे संघर्ष हमारा नारा है अशी घोषणा देत सुरु केलेल्या भारतीय दलित पँथरने पोटात तुझ्या पेटली आग उठ दलिता तोफा डाग अशी हाक देवून सार्या महाराष्ट्रातील आंबेडकरी युवकांना 'पँथर' बनविणारे रामदास जी आठवले साहेब यांचा वाढदिवस सोलापूर शहरात विविध सामाजिक, धार्मिक,शैक्षणिक,क्रीडा,आरोग्य विषयक,विधायक उपक्रम घेवून साजरा करण्यात आला, तसेच पक्ष कार्यालय या ठिकाणी मा.लोकनेते राजाभाऊ सरवदे साहेब यांच्या हस्ते केक कापून फटाक्याची आतिषबाजी करण्यात आली.

या वेळी संघटन म्हणजे भारतीय दलित पँथर! सळसळत्या रक्ताच्या तरुण क्रांतिकारी पँथर्सना सोबत घेवून दलितांवर होणार्या अन्याय अत्याचारांविरोधात बंड पुकारताना 'जय भीम के नारे पे खून बहे तो बहने दो' ची आक्रमक घोषणा देत भारतीय दलित पँथरचे ज्वालाग्रही वादळी आक्रमक नेतृत्व म्हणून पुढे आलेले नाव म्हणजे 'रामदास आठवले'!

७० च्या दशकात दलित पँथर आणि पुढे भारतीय दलित पँथरच्या वादळी चळवळीत तावून सुलाखून निघालेले नेतृत्व म्हणजे रामदास आठवले.पँथरच्या चपळाईने रामदास आठवले यांनी संपूर्ण देशात भारतीय दलित पँथरच्या छावण्या उभारल्या.रामदास आठवले उत्कृष्ट संघटक असल्यामुळे संपूर्ण देशात त्यांनी संघटन उभे केले. सामाजिक आणि आर्थिक विषमतेने गर्भगळीत झालेल्या गावकुसातील दलिताला स्वाभीमानाचे बळ देवून अन्याय अत्याचाराविरुद्ध लढण्याची हिंमत रामदास आठवले यांच्या पँथर चळवळीने दिली.



भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर या आपल्या प्राणप्रिय मुक्तीदात्याचे नाव मराठवाडा विद्यापीठाला देण्यात यावे या मागणीसाठी संपूर्ण महाराष्ट्रात नामांतर आंदोलन उभे राहिले.या नामांतर आंदोलनात भारतीय दलित पँथरने स्वत:ला वाहून घेतले.नामांतर आंदोलन हे १६ वर्षे चालले. संपूर्ण जगात मराठवाडा विद्यापीठ आंदोलन ऐतिहासिक आंदोलन ठरले.नामांतर आंदोलनात अनेक भीमसैनिक शहीद झाले.या आंदोलनात जीवाची बाजी लावून पँथर लढले.प्राण तळहातावर घेवून नामांतरासाठी राज्यभर गावागावात लढत फिरणारा अवलिया म्हणजे रामदास आठवले होत.आठवलेंनी मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलनात लाठी गोली खायेंगे फिर भी आगे जायेंगे ची घोषणा देत पोलिसांचा लाठी चार्ज खावून प्रसंगी तुरुंगवास भोगला.आंबेडकरी चळवळीत जीवाची बाजी लावून लढत रामदास आठवलें नावाचा संघर्षनायक घडला.आंबेडकरी चळवळीचे भाग्य आहे की रामदास आठवलेंसारखा झुंजार योद्धा या चळवळीचा शिर्षस्थ नेता म्हणून लाभला.महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना प्रमाण मानून त्यांनी दिलेल्या सामाजिक आणि आर्थिक समतेच्या उद्दिष्टासाठी हाती निळा झेंडा घेवून अहोरात्र झटणारा लोकनेता म्हणजे रामदास आठवले!

संघर्ष का दुसरा नाम रामदास आठवले है !असं त्यांच्या बद्दल म्हंटलं जातं एव्हढा संघर्ष करून तावून सुलाखून निघालेले नेते रामदास आठवले आहेत. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्ष साकार करण्यासाठी रामदास आठवलेंनी आपले सोन्यासारखे प्राणप्रिय संघटन भारतीय दलित पँथर बरखास्त केले. १९९० मध्ये भारतीय दलित पँथर ही संघटना बरखास्त करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे काम रामदास आठवलेंनी सुरु केले. १९९० मध्ये रामदास आठवलेंच्या नेतृत्वातील रिपाइं ने काँग्रेस आय ला पाठिंबा देवून विधानसभा निवडणूक लढली.त्या निवडणुकीत रामदास आठवलेंच्या नेतृत्वामुळे काँग्रेसला आंबेडकरी जनतेचे मतदान मिळाले.त्यामुळे काँग्रेसच्या ३५ जागा अधिक जिंकून आल्याची जाहीर कबूली तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी दिली.त्यांच्या मंत्रीमंडळात रामदास आठवले हे समाज कल्याण,परिवहन,दारुबंदी आदी चार खात्यांचे कॅबिनेट मंत्री बनले.ते मंत्री बनले त्या दिवशीही आठवले हे वडाळ्याच्या सिद्धार्थ हॉस्टेलमध्ये राहात होते.अत्यंत खडतर प्रवास आणि व्यवस्थेशी संघर्ष करणारा आपला 'पँथर' महाराष्ट्राचा कॅबिनेट मंत्री झाला याचे संपूर्ण देशात कौतुक झाले. रामदास आठवलेंच्या नावाची तेव्हा संपूर्ण देशात चर्चा झाली.अत्यंत गरीब परिस्थितीत शेतमजूर आईच्या पोटी जन्माला आलेले रामदास आठवले हे अवघे सहा महिन्यांचे असताना त्यांचे पितृछत्र हरपले. महाराष्ट्राच्या सांगली जिल्ह्यातील कवठेमहंकाळ तालुक्यात त्यांचे ढालेवाडी हे छोटे गाव. येथून जवळ असणार्या आगळगावात त्यांचा जन्म झाला.पुढे त्यांचे बालपण मामाच्या गावी सावळज (ता.तासगाव) येथे गेले.प्राथमिक शिक्षण सांगलीत झाले.

महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते मुंबईत आले. सिद्धार्थ हॉस्टेल वडाळा येथे त्यांनी प्रवेश घेतला. तेथे दलित पँथरचे संस्थापक राजा ढाले आणि नामदेव ढसाळ यांच्या संपर्कातून ते दलित पँथरच्या चळवळीत सक्रीय झाले. दलित पँथर ची पुढे त्यांनी भारतीय दलित पँथर करुन संपूर्ण देश पिंजून काढला.मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढ्याचे प्रारंभापासून नेतृत्व करुन १४ जानेवारी १९९४ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे नामांतर करुन या ऐतिहासिक आंदोलनाला यश मिळवून दिले.मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव न दिल्यास मंत्रीपदाचा आपण राजीनामा देवू असा निर्वाणीचा ईशारा ना. रामदास आठवले यांनी दिल्यामुळे तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी नामांतर केले.महाराष्ट्राचे समाज कल्याण मंत्री असताना रामदास आठवले यांनी मराठवाडा विद्यापीठ नामांतराचे केलेले कार्य संस्मरणीय ठरले आहे. नामांतराचे शिल्पकार रामदास आठवले म्हणून राज्यात त्यांचा आजही गौरवाने उल्लेख केला जातो. २५ डिसेंबर संघर्षनायक ना.रामदास आठवले यांचा वाढदिवस देशभर संघर्षदिन म्हणून रिपाइं तर्फे साजरा होतो.संघर्ष संयम आणि धैर्याचे महामेरू ठरलेल्या संघर्षनायक रामदास आठवले यांना देशसेवेसाठी उदंड आयुष्य आणि आरोग्य लाभो अशा शुभेच्छा राजाभाऊ सरवदे साहेब यांनी दिल्या..

या वेळी पक्षाचे महाराष्ट्र अध्यक्ष लोकनेते राजाभाऊ सरवदे साहेब,अतुल नागटिळक,प्रा.पवन थोरात,शाम धुरी,सुशील सरवदे,के.डी.कांबळे,राजेश उबाळे,सोमनाथ घोडोकुंबे,राजा धावणे,विकास सरवदे,मल्लू शिवशरण,सुमित शिवशरण,शिवराज पुल्लूर,श्रीनिवास सरवदे,दावला सुर्वे,शिवम सोनकांबळे,महेश पवार,आप्पा राऊत,बापू शिवशरण,सचिन कांबळे,सचिन शिंदे,सुग्रीव जेठिथोर,जीवन हिपर्गिकर,संजय गायकवाड,विकास चव्हाण,उपगुप्त चौधरी,राहुल वाळके,प्रशांत गायकवाड,महादेव बाबरे,बंटी घाडगे,संघपाल घोडकुंबे आदी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## धाराशिव मध्ये मनुस्मृतीचे दहन

धाराशिव/सुधाकर रणदिवे :विश्वरत्न,बोधिसत्व, परमपूज्य, महामानव, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासमोर मनुस्मृति चे दहन करण्यात आले या वेळी भीमसैनिक उपस्थित होते विवेक ( भैय्या )जाधव, शहराध्यक्ष सम्यक विद्यार्थी आंदोलन, प्रतीक गंगावणे, शहर सचिव सम्यक विद्यार्थी आंदोलन, वीरेंद्र झेंडे,कट्टर भीमसैनिक, महेश बनसोडे, कट्टर भीमसैनिक, व सर्व भीमसैनिक व जय भीम प्रतिष्ठानचे सर्व कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.



## मंगळवेढा येथील पहिल्या मराठा कुणबी जात प्रमाणपत्राचे आ.आवताडे यांच्या हस्ते वितरण

पंढरपूर/प्रतिनिधी : मराठा आरक्षण अनुषंगाने मंगळवेढा तालुक्यातील पहिल्या मराठा कुणबी जातीच्या प्रमाणपत्राचे वितरण पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान दादा अवताडे यांच्या हस्ते व प्रांत अधिकारी बिहार माळी व तहसीलदार मदन जाधव यांच्या उपस्थितीमध्ये आमदार झाल्यासारखं कार्यालय मंगळवेढा येथे घुले परिवाराकडे करण्यात आल. सदर प्रसंगी घुले परिवारातील असता मनोहर घुले जयदेव मनोहर घुले व ओमराजे मनोहर घुले यांना या प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले शिक्षक आणि नोकरी या क्षेत्रामध्ये मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून टिकणारे आरक्षण मिळाले पाहिजे या मागणीसाठी गेल्या अनेक वर्षापासून अविरतपणे लढा सुरू आहे. नुकत्याच संपन्न झालेल्या हिवाळी अधिवेशनामध्ये आमदार महोदयांनी मराठा समाजाच्या आरक्षणा संदर्भात आक्रमक भूमिका दाहकता माझ्यासाठी महत्त्वपूर्ण असल्यामुळे समाजाचे या लढाईमध्ये मी नेहमीच समाजबांधवाच्या बरोबरीने असेल असा शब्द आमदार समाधान आवताडे यांनी यावेळी दिला

## पंढरपूर शहर पोलीस स्टेशनची पर राज्यातील महिलांवर मोठी कारवाई

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर शहर पुणे प्रकटीकरण शाखेची चांगली कामगिरी पंडित श्री प्रदीप जी मिश्रा यांचे महाशिवपुराण या कार्यक्रमासाठी पंढरपूर शहरात आलेल्या भावी भक्तांचे सोन्याचे दागिने चोरणाऱ्या पर राज्यातील एकूण १३ महिला व एक पुरुष यांना पोलिसांकडून अटक करण्यात आले आहे

पंढरपूर शहर पोलीस ठाणे हद्दीतील चंद्रभागा बस स्टँड या ठिकाणी २५ डिसेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत पंडित प्रदीप जी मिश्रा यांचे शिव महापुराण कथेची आयोजन सदरच्या ठिकाणी लाखोच्या संख्येत परराज्यातून भाविक आले आहेत भाविक यांचे सोने व त्यांच्या वस्तू चोरीला जाऊ नये म्हणून मुलं वस्तू चोरीला जाऊ नये म्हणून सोलापूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री शिरीष देशपांडे अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर यांनी गुन्ह्याचा प्रतिबंधक व्हा म्हणून साध्या वेशात पोलीस पोलिसांकडून प्रतिबंधक व्हावा होण्याचे गुन्हे उघड करावे तसे आदेश केले होते



उपविभागीय पोलीस अधिकारी ड्रॉ अर्जुन भोसले पंढरपूर शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण फुगे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर शहर पोलीस गुन्हे प्रकटीकरण शाखेने विविध पदके तयार केली होती कार्यक्रमाच्या ठिकाणी व गर्दीच्या ठिकाणी साध्या विषयात पोलिसांनी राज्यातील राज्य उत्तर प्रदेश व राजस्थान येथील १३ महिला व एक पुरुष यांना अटक केली आहे सदर बाबत पंढरपूर शहर ठाण्यात दाखल असलेली गुन्हे गुन्हा एक १) रजिस्टर क्रमांक७८८/२०२३ भा द वि कलम३७९. २) गुन्हा रजी क्रमांक७८९/२०२३ भादवि कलम ३७९. ३) गुन्हा राजी क्रमांक७९०/२०२३ भादावी कलम ३७९.४). गुन्हा रजी क.७९०/२०२३. भादवि कलम ३७९. प्रमाणे पंढरपूर शहर पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल आहेत. सदरची कामगिरी.मा श्री शिरीष देशपांडे माअाप. पोलीस अधीक्षक श्री प्रीतम यावलकर पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर विभाग श्री अर्जुन भोसले वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरपूर शहर अरुण फुगे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण चे पोलीस निरीक्षक प्रशांत भागवत सहाय्यक पोलीस नागनाथ कदम पोह१०६३ बिपिन ढेरे पोह ३९६ सुरज हेंबाडे पोह४१९ शरद कदम पोह१००५ पठाण पोह.२२१. आवटी पोह.१७८९. सचिन हेंबाडे पो.ना.१७३६. सचिन हेंबाडे.पो.ना. ४८४. सुनील बनसोडे पो.ना.५६२. लोहा र.पो.शि.१३१६. शहाजी मंडले पो.शि. समाधान माने यांनी काम केले आहे

## वारकरी सांप्रदायिक हा खऱ्या अर्थाने हिरा आहे : पंडित प्रदीप मिश्रा

चेअरमन अभिजीत पाटील यांच्या माध्यमातून पंढरी नगरीत श्री हरिहर शिव महापुराण कथा सोहळ्याचा पहिला दिवस अत्यंत उत्साहात संपन्न



पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष यांच्या माध्यमातून सिंहोर येथील सुप्रसिद्ध पंडित पूजनीय श्री.प्रदीप मिश्रा महाराज यांच्या सुश्राव्य वाणीत चंद्रभागा मैदान येथे श्री हरिहर शिव महापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे.

पंढरपूर तसेच पंचक्रोशीतील लाखो भाविकांची या कार्यक्रमासाठी उपस्थिती होती. पूजनीय श्री.प्रदीप मिश्रा महाराज यांची कथा जगभरात अनेक ठिकाणी होत असताना, पंढरपूर येथे या कथेचे आयोजन श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी अयोजन केले असता ही भाविकांसाठी एक उत्तम पर्वणी ठरत आहे..

पंढरपूर प्रदक्षिणा, यात्रा काढण्यात आली. यावेळी श्री विठ्ठल मंदिरात दर्शनासाठी जाताना देखील महाराजांच्या दर्शनासाठी भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या निमित्ताने पंढरपूरकरांनी पुन्हा एकदा जणू वारीचाच अनुभव घेतला. दि.३१ डिसेंबर पर्यंत ही कथा दररोज दुपारी १ वाजता होणार असून यजमान श्री.अभिजीत धनंजय पाटील यांनी अधिकाधिक संख्येने भाविकांनी या कथेचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

## दुधनी दलित वस्ती योजनेत मंजूर झालेला काम दलित वस्तीतच करावे : सैदप्पा झळकी

### दुर्लक्ष करून गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करणार



अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथे शासना मार्फत मंजूर झालेल्या विविध कामे दुधनी नगर परिषदेतील मुख्याधिकारी व संबंधीत अधिकारी हलगर्जिपणा न करता, दलित योजना अंतर्गत मंजूर कामे संबंधीत दलित वस्तीतच करावे.अशी मागणी रिपब्लीकन पक्षाचे (आठवले गट)जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांनी केली आहे. दलित वस्तीचे विविध योजने अंतर्गत शासन स्तरावरुन मंजुरी मिळालेल्या कामे दुधनी नगर परिषदे मार्फत सुरु केली जाते. विशेष म्हणजे दलित वस्तीत मंजूरीनंतर प्रत्येक कामे उशीरा सुरु केली जाते किंवा आराखड्या प्रमाणे मंजूर झालेल्या कामे करत नाही संबंधित ठेकेदार सोयी अनुसार आर्थिक गैरव्यवहार करुन बोगस एम बी करून एस्टिमेंट बदल करून मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहाराने कामे केली जातात.

वस्तुस्थिती अशी आहे की बहुतेक कामे आराखडा प्रमाणे केली जात नाही. त्यातील मक्तेदार आणि अधिकारी यांच्या परस्पर आर्थिक व्यवहार होऊन दलित वस्तीतील कामे इतर ठिकाणी केली जाते मागे असे कामे झालेली आहे. या पुढे अशा प्रकारच्या कामे दलित वस्तीतच करण्यात यावे अन्यथा रिपाइं खपवून घेणार नाही अशा इशाराही सैदप्पा झळकी यांनी केली आहे.

दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत कंत्राटदारांच्या सोयी प्रमाणे एस्टिमेंट बदलून भोगस कामे करतात तेही अत्यंत निकृष्ट दर्जाचे. दलित वस्तीतील कामे आहेत कसेतरी व्हावे या हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले जाते. आणि निरुपयोगी व अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम केली जाते.तसे झाल्यास अशा प्रकारच्या कामा विरुध्द वरिष्ठ अधिकार्यांच्या लक्षात आणून संबंधित भ्रष्ट अधिकार्यांना शोधून काढून त्यांच्या वर गुन्हा दाखल करण्यात येईल अशा इशारा झळकी यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना व्यक्त केली

## लग्नाच्या वाढदिवसाच्या निमित्त वृद्धाश्रमास जीवनावश्यक वस्तू वाटप

सैनिक टाकळी/संजय चव्हाण : शिरोळ तालुक्यातील अकिवाटगायरान मध्ये गुरुदत्त साखर कारखान्यासमोर सद्गुरु बाळूमामा



मंदिराजवळ आज २६ १२ २०२३ रोजी सकाळी साडे अकरा वाजताशिरढोण सर्कल माननीय मच्छिंद्र कुंभार साहेब राहणार रांगोळी कुंभार साहेबांची मुलगी सायली कुंभार जावई रमेश कुंभार यांच्या लग्नाचा दुसऱ्यांवाढदिवसा निमित्तश्रावण बाळ वर्धा आश्रम येथे मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला केक कापून व वर्धा आश्रम मधल्या सर्व ज्येष्ठ नागरिकांचा आशीर्वाद घेऊन त्यांना थंडीची उब मिळावी म्हणून त्यांना शाल जीवनावश्यक साहित्य वाटप करण्यात आले यावेळी संस्थेच्या संचालिका शोभाताई पानदारे यांनी स्वागत केले यावेळी त्यांच्याबरोबर सदाशिव गणू कुंभार व त्यांच्या सौभाग्यवती अबू ताई कुंभार मानसी कुंभार, वैष्णवी कुंभार, प्रेम कुंभार अर्चना कुंभार हे सर्व उपस्थित होते संस्थेमधील सर्व ज्येष्ठ वृद्ध नागरिक स्वयंसेवक शिवाजी कोळी, मल्लाप्पा कोरे आवर्जून उपस्थित होते सर्व कुंभार परिवारांचे आभार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश सासणे यांनी मांडले आश्रमातील स्वच्छता टॉप टीप पाहून कुंभार साहेब मंडळ अधिकारी शिरढोण यांनी प्रशासना केली व कौतुकी केले हा कार्यक्रम पार पडला धन्यवाद

## जिल्हा नियोजन समितीची बैठक

सोलापूर/प्रतिनिधीः उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समिती व कार्यकारी समितीची बैठक गुरुवार दिनांक २८ डिसेंबर २०२३ रोजी दुपारी १.०० वाजता निजोजन भवन सभागृह सात रस्ता सोलापूर येथे आयोजित करण्यात आली आहे. तरी या बैठकीस खासदार,आमदार आदि लोकप्रतिनिधी तसेच नियोजन समितीचे सर्व अशासकीय सदस्य यांनी उपस्थित राहावे. सर्व शासकीय यंत्रणांनी बैठकीच्या अनुषंगाने सर्व आवश्यक माहितीसह बैठकीच्या वेळेपूर्वी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांनी केले आहे.

# उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मीडिया टॉवर गृहनिर्माण प्रकल्पाचे भूमिपूजन

पुणे : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्यावतीने साकारण्यात येणाऱ्या 'मीडिया टॉवर' या खाजगी तत्वावरील गृहनिर्माण प्रकल्पाचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. पत्रकारांना स्वस्तातील घरे मिळावीत यासाठी गृहकर्जावरील व्याजावर सवलत देण्याची योजना आणण्याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करण्यात येईल, असे प्रतिपादन श्री.फडणवीस यांनी यावेळी केले.

हॉटेल जे.डब्ल्यु.मेरिएट येथे आयोजित या कार्यक्रमास पीएमएमआरडीएचे आयुक्त राहुल महिवाल, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, दै.पुढारीचे समूह संपादक डॉ.योगेश जाधव, दै.लोकमतचे संपादक संजय आवटे, दै.सकाळचे संपादक सम्राट फडणीस, भगवती ग्रुपचे बाबासाहेब औटी, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे संघटक संजय भोकरे, प्रदेशाध्यक्ष किरण जोशी आदी उपस्थित होते.

नवी दिशा देणारा प्रकल्प पुण्यात उभारला जात असल्याचे नमूद करून उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रातील इतर शहरात असे प्रकल्प होतांना पहायला मिळतील. पत्रकारांच्या अनेक अडचणी आहेत. त्यांची स्वत:ची हक्काची घरे आढळून येत नाही. त्यामुळे मोहिम म्हणून पत्रकारांच्या घराचा प्रकल्प हाती घ्यावा लागेल. माध्यमांची संख्या आणि प्रकार वाढले आहेत. सर्वसामान्य घरातील तरुण-तरुणी या व्यवसायात कार्यरत आहेत. त्यांच्या जीवनात स्थैर्य येणे ही महत्वाची बाब आहे. माध्यमे स्वतंत्र आणि नि:ष्पक्ष राहण्यासाठी माध्यम संस्थेतील शेवटच्या घटकांना सामाजिक सुरक्षा द्यावी लागेल, असे ते म्हणाले.

पत्रकार हल्ला विरोधी कायदा मंजूर करण्यात आला आहे. महात्मा फुले जनआरोग्य योजना सर्व पत्रकारांना लागू करण्यात आली आहे, त्याची व्याप्ती वाढवून त्यांचे कुटुंबियही या योजनेच्या कक्षेत आणण्याचा प्रयत्न आहे. म्हाडाच्या लॉटरीतही पत्रकारांना मुंबईत घरे मिळाली. मात्र पत्रकारांच्या वाढती संख्या लक्षात घेता त्या प्रमाणात ही संख्या कमी आहे. मीडिया टॉवरसाठी जागा मिळविणे महत्वाची बाब असून महसूली मुख्यालयी असे प्रकल्प उभारण्यासाठी सहकार्य करण्यात येईल, त्यासाठी आवश्यक असल्यास स्वतंत्र अधिकारी नेमण्यात येईल.

येत्या २० वर्षातील देशाचे ग्रोथ इंजिन होण्याची पुण्याची आणि पीएमआरडीएची क्षमता आहे. नव्या युगाचे उद्योग समाविष्ट करण्याची क्षमता असणारे हे शहर आहे.म्हणून रिंगरोडसारखे विकासाचे प्रकल्प प्राधान्याने हाती घेण्यात येत आहेत. पुण्याच्या वेगवान विकासासाठी नवे विमानतळ आवश्यक आहे. त्यामुळे नागरिकांना याबाबतच्या शंका असल्यास त्यांचे निरसन करण्यात येईल. विमानतळासाठी जमीन दिलेल्यांना समृद्ध होण्याचा अनुभव होईल, असे पॅकेज देण्यात येईल. पुण्याच्या विकासासाठी जनआंदोलन उभे राहण्याची गरज आहे.

देशाचे येत्या काळातील महत्वाचे केंद्र म्हणून पुण्याची ओळख प्रस्थापित होईल. यावेळी श्री.जाधव, श्री.आवटे, श्री.फडणीस, श्री.औटी, श्री.भोकरे, श्री. जोशी यांनीही यावेळी विचार व्यक्त केले.



# एस.जी.परमशेट्टी प्रशालेत आंतरशालेय क्रीडा स्पर्धेचे उद्‌घाटन उत्साहत संपन्न

दुधनी/निंगपा निंबाळ : दुधनी येथिल श्री शांतलिंगेश्र्वर शिक्षणप्रसारक संस्था हिरेजेवरगी - दुधनी संचलित श्री एस जी परमशेट्टी प्रशालेत आंतर शालेय क्रीडा स्पर्धेचे शुभारंभ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध व्यापारी राजशेखर परमशेट्टी होते आंतर शालेय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन गायत्री क्लासेसचे संस्थापक अध्यक्ष अंबिका पाटील - टक्कळकी यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करून करण्यात आले क्रीडा ज्योत प्रज्वलन माळी समाजाचे माजी अध्यक्ष राजू म्हेत्रे सर यांच्या हस्ते करण्यात आले मैदानाची पूजा प्रसिद्ध व्यापारी प्रशांत लोणी यांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रशालेचे क्रीडा प्रमुख दत्तात्रय हिळ्ळी यांनी सर्व मान्यवरांचे परिचय करून स्वागत केले तसेच सरस्वती मातेचे पूजन शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष्या राखी खंडाळ व उपाध्यक्ष्या प्रभावती हौदे यांच्या हस्ते करण्यात आले दीप प्रज्वलन प्रकाश परमशेट्टी बसवराज होदे व गुरुशांत गंगावती यांच्या हस्ते करण्यात आले उद्घाटक अंबिका पाटील - टक्कळकी यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांनी आपली शक्ती व बुद्धी योग्य मार्गाला लावावा व बौद्धिक बरोबर क्रीडा क्षेत्राकडेही लक्ष देण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले याप्रसंगी या शाळेने राष्ट्रीय खेळाडू निर्माण केले अशा प्रकारचे शिक्षक या ठिकाणी आहेत याचा मला अभिमान आहे हे सांगयला ही विसरले नाही याप्रसंगी मुख्याध्यापकांनीही मनोगत व्यक्त केले आंतरशालेय क्रीडा सप्ताहात खो खो कबड्डी क्रिकेट १०० मीटर धावणे लिंबू चमचा संगित खुर्ची ४१०० रिले स्लो सायकलिंग असे अनेक खेळांचे आयोजन या क्रीडा सप्ताहात करण्यात आले आहे या क्रीडा सप्ताह कार्यक्रमाच्या प्रसंगी प्रशालेचे मुख्याध्यापक आर जी आलिगावे पर्यवेक्षक लक्ष्मीपुत्र गद्दी यांच्यासह पालक वर्ग सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागराज कलबुर्गी यांनी केले तर मान्यवरांचे आभार राजशेखर पाटील यांनी मानले

# छात्रभारतीचे चाळिसावे अधिवेशन उत्साहात

## दिग्दर्शक सचिन गोस्वामी, अभिनेत्री अमृता सुभाष, पत्रकार साहिल जोशी प्रा. लक्ष्मण यादव यांची उपस्थिति






मुंबई : विविध क्षेत्रांतल्या मान्यवरांची विविध विषयांवरची विचारप्रवृत्त करणारी भाषणे आणि मुलाखती, डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्यावरील विशेष चित्र शिल्प कला प्रदर्शन, तरुणांचा सहभाग असलेला शिक्षण व रोजगाराच्या प्रश्नांवर परिसंवाद, प्रबोधनपर सांस्कृतिक कार्यक्रम, राष्ट्रभक्तिपर कार्यक्रम, भारतीय संविधान व नागरिकांचे शिल्पाकृती, छात्रभाराताच्या सर्व केंद्रांचा अहवाल, महाराष्ट्रातील शिक्षण-रोजगाराच्या लढ्याच्या अनुषंगाने ठराव. अशया भरगच्च कार्यक्रमांसह छात्रभारतीचे चाळिसावे राज्यस्तरीय अधिवेशन नुकतेच मोठ्या उत्साहात पार पडले.

मुंबईच्या चेतना महाविद्यालयात ता. २३ आणि २४ डिसेंबर २०२३ रोजीहे अधिवेशन संपन्न झाले. या अधिवेशनाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. डॉ. दाभोलकर यांच्याविषयीचे चित्रप्रदर्शन हे या अधिवेशनाचे मुख्य आकर्षण ठरले. या प्रदर्शनाचे उद्घाटन अभिनेत्री अमृता सुभाष, दिग्दर्शक सचिन गोस्वामी, आमदार शिरीष चौधरी, 'चेतना संस्थे'चे अध्यक्ष श्रीपाद हळदणकर व मा. नितीन वैद्य यांच्या हस्ते झाले.

राष्ट्र सेवा दलासाठी ज्यांच्या मागील दोन पिढ्या काम करत आहेत त्या अभिनेत्री अमृता सुभाष या वेळी म्हणाल्या, ''सेवा दलाचा दोन पिढ्यांचा वारसा मला असल्यामुळे त्याचा उपयोग मला अभिनयक्षेत्रात झाला.'' छात्रभारतीचे माजी कार्यकर्ते दिग्दर्शक सचिन गोस्वामी म्हणाले, ''मी धुळ्यात असताना छात्रभारतीचे पहिले अध्यक्ष मु. ब. शहा यांच्या अध्यक्षतेखाली कलापथकात काम केले. नर्मदा बचाव आंदोलनातही आमचा सक्रिय सहभाग होता.छात्रभारतीचा चांगला परिणाम माझ्यावर आहे. माझ्या कार्यक्रमांतून माझी भूमिका नेहमी स्पष्ट होत असते.'' महाराष्ट्रातील हास्यजत्रा या कार्यक्रमातील मामाजींच्या आवाजात 'हलो! अरे काय म्हणतो इथे छात्रभारतीला सगळे जमेले, मी तिथे जायल होतो, त्यांना सांगितलं आपल्याकडे आपल्या विचारांचा एवढा चांगला गोड ऊस ये, लोकांच्या साखर कारखान्यात पाठवा आणि साऱ्या समाजामध्ये साखर वाटा. असे बोलताच सर्व सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला.

राष्ट्र सेवा दलाच्या संस्थापकांपैकी एक असलेले धनाजी नाना चौधरी यांचा वारसा पुढे नेणारे आमदार शिरीष चौधरी म्हणाले, ''माझ्या वडिलांकडून मला या विचारांचा वारसा मिळाला. माझा छात्रभारती विद्यार्थी संघटनेशी तसा जुना परिचय आहे. खिरोदाला शैक्षणिक संस्थेत काम करत असताना कालेजमधील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी सेवाभावाने व आत्मीयतेने लढणारे कार्यकर्ते मी जवळून पाहिलेत व तेव्हापासूनच मी छात्रभारतीच्या युवा साथींवर प्रभावित होतो.

दिग्दर्शक नितीन वैद्य यांनी अधिवेशनाला शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाचे अध्यक्ष, तसेच छात्रभारतीचे राज्याध्यक्ष रोहित ढाले यांनी सर्व प्रमुख पाहुण्यांचा सत्कार केला, तर छात्रभारतीच्या संघटिका स्वाती त्रिभुवन व सदस्या दीपाली आंब्रे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यानंतर देवयानी फुले हिने 'मी सावित्री बोलतेय!' हे एकपात्री नाटक सादर केले.

प्रा. सागर भालेराव व वनश्री रादीये यांनी 'मुंबई तक'चे संपादक साहिल जोशी यांची मुलाखत घेतली. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध सामाजिक-राजकीय प्रश्नांची उत्तरे जोशी यांनी या वेळी दिली. यानंतर छात्रभारतीचे कार्याध्यक्ष समाधान बागुल यांनी 'मुलींचे मोफत शिक्षण' या विषयावर मते मांडली. राज्य कार्यवाह अनिकेत घुले यांनी 'मराठी शाळा वाचवा' याविषयी तरुणांना आवाहन केले. राज्य सचिव छाया काविरे यांनी 'शिक्षणव्यवस्था आणि बळी पडणारा विद्यार्थी' या विषयावर मार्गदर्शन केले, तर राज्य-संघटक सचिन बनसोडे यांनी रोजगारासंदर्भातील सद्यस्थितीवर भाष्य केले.

दरम्यान साक्षी गवस, भूषण पाटील, प्रफुल्ल कांबळे, चेतना अमृतकर, युवराज साळवे, निकेत वाळके, अश्र्विन बाइत, प्रशांत खंदारे, संदीप जाधव,राहुल जऱ्हाड, या छात्रभारतीच्या केंद्रप्रमुखांनी अहवाल सादर केले. 'रंग अमन के' या प्रबोधनपर सांस्कृतिक कार्यक्रमाने पहिल्या दिवसाच्या कार्यक्रमांची सांगता झाली. या कार्यक्रमात छात्रभारतीचे महाराष्ट्रातील सर्व आजी-माजी कार्यकर्ते उपस्थित होते. दुसऱ्या दिवशी, म्हणजे ता. २४ डिसेंबर रोजी 'नवीन शैक्षणिक धोरण' या विषयावर प्रा. लक्ष्मण यादव यांचे व्याख्यान झाले. यानंतर

छात्रभारतीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. अधिवेशनाच्या समारोपात रोहित ढाले यांनी सविस्तर मांडणी करत महाराष्ट्रातील शैक्षणिक प्रश्नांवर पुढील वर्षभरात कसे काम होईल याबद्दल मार्गदर्शन करत छात्रभारतीची भूमिका मांडली. या दोन दिवसीय अधिवेशनाचे संपूर्ण सूत्रसंचालन लोकेश लाटे व चेतन पाटील यांनी केले.अशी माहिती छात्रभारतीचे मुंबई अध्यक्ष विकास पटेकर यांनी दिली.

# स्त्री मुक्ती दिन व ख्रिसमस नाताळ निमित्त अक्कलकोट येथे वंचित वतीने विविध उपक्रम

## महिला सफाई कामगारांना साडी वाटप करून सन्मान करण्यात आला



अक्कलकोट/प्रतिनिधी: वंचित बहुजन आघाडी अक्कलकोटच्या वतीने स्त्री मुक्ती दिवस आणि क्रिसमस नाताळ सणाच्या निमित्ताने वंचित बहुजन आघाडी सोलापूर जिल्हा अध्यक्ष श्रीशैल गायकवाड आणि दक्षिण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महेश स्वामी यांच्या हस्ते शहरातील सफाई महिला कर्मचाऱ्यांना साडी वाटप करून त्यांचा सन्मान करण्यात आला

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड मुक्कामी मनुस्मृति दहन केले, ही घटना भारतीय स्त्रीमुक्तीची पहाट होती, आजही या दिनाचे महत्त्व कमी झालेले नाही, वंचित बहुजन आघाडीच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात स्त्री मुक्ती दिन साजरा करण्यात आला२५ डिसेंबर ख्रिश्र्चन धर्म संस्थापक येशू ख्रिस्त यांचा जन्मदिवस हा जगभरात अतिशय आनंदात साजरा केला जातो.वंचित बहुजन आघाडी अक्कलकोटच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अक्कलकोट तालुका अध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तालुका महासचिव नागेश हरवाळकर यांच्या आयोजनाखाली येशू ख्रिस्त यांचा जन्मदिवस अक्कलकोट येथे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते केक कापून नाताळ सण साजरा करण्यात आला

अक्कलकोट नगरपालिका येथील आपलं शहर व परिसर स्वच्छ ठेवणाऱ्या व आपल्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या महिला सफाई कर्मचारी यांना शाल, गुच्छ, साडी असे मानसन्मान देऊन त्यांचा गौरव करण्यात आला

त्याप्रसंगी अक्कलकोट तालुका अध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे, जिल्हा संघटक देवानंद अस्वले, वंचित कामगार संघटना तालुका अध्यक्ष सिद्धार्थ बनसोडे, तालुका महासचिव नागेश हरवाळकर, शहर अध्यक्ष विशाल ठोंबरे, सोलापूर जिल्हा युवक उपाध्यक्ष प्रकाश शिंदे, महासचिव भारत देडे, श्याम बनसोडे, सम्यक विद्यार्थी आंदोलन मा.तालुका अध्यक्ष रविराज पोटे, संकेत शिरसे, गंगाराम गायकवाड, रतन इंगळे, सुनील शिंगे, संतोष घाटगे, अमोल गायकवाड, रोहित गायकवाड, सनी गायकवाड, हनुमंत जाधव, गंगाराम वाघमारे, साळुंखे अण्णा, विलास शिंदे, निमगावचे उत्तम आणि गौतम आदीसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

# हत्तीकणबस जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेच्या माजी विद्यार्थ्याचा भव्य सत्कार


हत्तीकणबस/प्रतिनिधीः हत्तीकणबस जि. प. प्रा. मराठी शाळेचा माजी विद्यार्थी व सध्या बारावी कला शाखेत खेडगी महाविद्यालयात शिकत असलेला विद्यार्थी राहुल सोमनाथ गेजगे याची नुकतीच महाराष्ट्र राज्य कला महोत्सव २०२३-२४ अंतर्गत राज्यस्तर सादरीकरणातून संगीत वाद्य अंतर्गत हलगी वादन या कलेसाठी



राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी ९ ते १२ जानेवारी रोजी राष्ट्रीय बालभवन नवी दिल्ली येथे ही स्पर्धा होणार आहे.या यशाबद्दल जि. प. प्राथ. मराठी केंद्रशाळा हत्तीकणबस शाळेकडून माजी विद्यार्थ्याचा सत्कार शाळेच्या वतीने मोठ्या जल्लोषात करण्यात आला. शाळेचे केंद्रीय मुख्याध्यापक श्री. इस्माईल मुर्डी सर व सर्व स्टाफ व तसेच या कार्यक्रमासाठी गावातील प्रतिष्ठित नागरिक व तंटा मुक्त समिती अध्यक्ष श्री. प्रकाश बिराजदार व माजी तंटा मुक्त अध्यक्ष श्री. शिवराया बिराजदार यांचे हस्ते राहुलचा भव्य सत्कार करून त्याला शुभेच्छा देण्यात आल्या. या कार्यक्रमासाठी श्री. मंगरूळे सर , श्री. शीतल डावरे सर, श्री. राजाराम सुरवसे, श्री अरुण पांचाळ, श्री. विक्रम जाधव व सौ. बबिता कोरेकर मॅडम यांच्या उपस्थितीत व शाळेच्या शा. व्य. समितीचे अध्यक्ष श्री. देवेंद्र बिराजदार, उपाध्यक्ष श्री. पंचप्पा घोडके व सर्व सदस्य, शंकरलिंग प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. श्रीशैल पाटील सर, श्री.अश्पाक शेख सर, व शेट्टे सर व राहुलचे वडील श्री. सोमनाथ गेजगे, सर्व ग्रामस्थांनी राहुलला राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.शेवटी केंद्रीय मुख्याध्यापक श्री. इस्माईल मुर्डी सर यांनी कार्यक्रमास उपस्थितांचे आभार मानून चहापानानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# यात्रेनिमित्त मोट्याळ येथे लावण्यखणी कार्यक्रमाचे आयोजन

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील मोट्याळ येथे दिनांक ६ जानेवारी रोजी हजरत पीर दावल मलिक यात्रेनिमित्त आनंद भाऊ सुरवसे मित्र परिवार यांच्या वतीने भव्य अशा लावण्यखणीचे आयोजन



करण्यात आल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.दरवर्षी मोट्याळ येथे मोठ्या उत्साहात यात्रेचे आयोजन करण्यात येते या वर्षी देखील तितक्याच दिमाखेदार पद्धतीने यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे त्यामुळे महाराष्ट्राची लोककला आणि संस्कृती जपण्यासाठी या लावण्यखणीचे आयोजित करण्यात आल्याची माहिती युवा नेते आनंद सुरवसे यांनी दिली आहे. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून पुण्याचे उद्योगपती खादिर फकीर असणार आहेत तर कार्यक्रमाचे अध्यक्ष मोरया प्रतिष्ठानचे अध्यक्ष रामचंद्र शिंगटे असणार आहेत. या कार्यक्रमास सहकार्य अंकुश शिंगटे,शत्रूगुण शिंगटे, दुशांत कदम,अतुल शिंदे,श्रीकांत पवार,सागर साळुंखे,आकाश मोरे,जोतिबा पवार,आनंद खांडेकर, अण्णासाहेब शिंगटे,अभिजित निंबाळकर,सहदेव बंडगर,सिद्धार्थ इंडे,नारायण शिंदे,ओदुबर बिराजदार, प्रविण निंबाळकर, लक्ष्मण खांडेकर, अभिजित कोळी,मारुती खांडेकर,एकनाथ बेडगे,वैभव बंडगर यांच्या सह आदी जणाचे सहकार्य लाभणार आहे. या लावण्यखणी कार्यक्रमास पंचक्रोशितील सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन युवा नेते आनंद सुरवसे यांनी केले आहे.

# विद्यार्थ्यानी नोकरीच्या मागे न लागता उद्योगाकडे वळावे




अक्कलकोट/प्रतिनिधीः विद्यार्थ्यानी नोकरीच्या मागे न लागता उद्योगाकडे वळावे असे मत बोरामणीच्या उद्योजिका अनिता माळगे यांनी व्यक्त केले.

महर्षि विवेकानंद समाज कल्याण संस्थेच्या मातोश्री गुरूबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने आयोजित केलेल्या मौजे मैदर्गी ता.अक्कलकोट येथील विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या तिस-या दिवशी विद्यार्थ्यांसमोर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जगदेवी उकली (निंबाळ) तर सावित्री पाटील, संगीता पाटील, गौराबाई लोणी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्य व उच्च माध्य. च्या विभाग प्रमुख सौ पूनम कोकळगी, सेमी इंग्रजी विभाग प्रमुख रूपाली शहा हेही होते. प्रारंभी कार्यक्रम आधिकारी प्रा.राजशेखर पवार यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन राष्ट्रीय सेवा योजनाचे स्वयंसेवक समर्थ पवार यांनी केले. आभार राष्ट्रीय सेवा योजना ची स्वयंसेविका पायल कांबळे यांनी मानले कार्यक्रमास प्रा बाळासाहेब पाटील, प्रा. जयश्री वाले आदी उपस्थित होते.